# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे

जा.क्र. मनपा/आ.व्य./ २२८ /२०२३-२४ दि. १२/१०/२०२३

**विषय : १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजता आंतरराष्ट्रीय धोके निवारणाच्या दिवशी प्रतिज्ञा घेणेकरीता उपस्थित राहणेबाबत.**

**परिपत्रक**

संयुक्त राष्ट्र संघाने आपत्ती धोके कमी करण्यासाठी लोकांमध्ये याबाबत जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने १३ ऑक्टोबर हा आपत्ती निवारण दिवस म्हणून घोषित केला आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली (NDMA) यांनी नागरीकांना आपत्ती प्रतिसादासाठी कटिबद्ध होण्यासंदर्भात सन २०२३ या वर्षी प्रतिज्ञा तयार केली आहे.

सदर प्रतिज्ञा घेणेकरीता मुख्य कार्यालय, दुसरा मजला येथे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सकाळी ११:०० वाजता उपस्थित रहावे. जे अधिकारी / कर्मचारी अनुपस्थित रहातील त्यांचे विरूद्ध कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**(मारूती गायकवाड)**
**उप-आयुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

**१) सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख**
**२) सर्व अधिकारी / कर्मचारी (स्थायी / अस्थायी /ठेका)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रतिज्ञा**

"प्रतिज्ञा करतो/करते की,
शासनाच्या आपत्ती सौम्यीकरण्याच्या विविध उपक्रमात
मी सक्रिय सहभाग नोंदवून,
आपत्ती पासून माझी, माझ्या परिवाराची, माझ्या समाजाची
व सार्वजनिक मालमत्तेची सुरक्षा करण्याविषयी ज्ञान प्राप्त करीन,
आपत्तीचे धोके कमी करणाऱ्या समुदाय आधारित उपक्रमामध्ये
मी सक्रिय सहभाग घेईल,
माझ्या परिवारात व समाजात आपत्ती बद्दल जनजागृती करून
त्यासंबंधी पूर्वतयारी कशी करावी याविषयी सदैव प्रयत्न करीन.
राज्यातील आपत्ती प्रवण भागात,
जीवित, वित्त व पर्यावरण विषयक हानी होऊ नये म्हणून,
मी सदैव कटिबद्ध राहीन."